लोकमत

# समाजाभिमुख कार्यामुळे रवळनाथची प्रगती : के. बी. गुडसी

## फायनान्सच्या धारवाड शाखेचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**उत्तूर :** आजरासारख्या ग्रामीण भागात सुरू झालेल्या रवळनाथ हाउसिंग फायनान्स सोसायटीने स्थापनेपासूनच सहकाराबरोबरच सामाजिक बांधीलकी जपली आहे. ही संस्था बँकिंग व्यवसायाच्या माध्यमातून सर्व स्तरांतील घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न करीत आहे. समाजाभिमुख कार्यामुळे या संस्थेने १,००० कोटींहून अधिक व्यवसाय केला व सहकार क्षेत्रात एक मानदंड निर्माण केला, असे प्रतिपादन धारवाड येथील कर्नाटक विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. डॉ. के.बी. गुडसी यांनी केले.



रवळनाथ हाउसिंग फायनान्सच्या धारवाड शाखेचे उद्घाटन करताना माजी कुलगुरू के.बी. गुडसी, सुनील बागेवाडी, मल्लाप्पा चौगुले, शिवानंद चौगुले व मीना रिंगणे उपस्थित होते.

श्री रवळनाथ हाउसिंग फायनान्स सोसायटीच्या पंधराव्या धारवाड शाखेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

प्रा. गुडसी म्हणाले, नोकरी करीत असतानाच मल्लाप्पा चौगुले यांनी मोठे स्वप्न पाहिले व रवळनाथ हाउसिंग फायनान्सच्या रूपाने ते सत्यात उतरविले. त्यांच्या कुशल नेतृत्वामुळेच संस्थेची प्रगती होत आहे. चौगुले यांचे नेतृत्व सहकार क्षेत्रासाठी आदर्श आहे.

यावेळी धारवाड असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्सचे अध्यक्ष सुनील बागेवाडी, रवळनाथचे संस्थापक अध्यक्ष मल्लाप्पा चौगुले यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी उपाध्यक्षा मीना रिंगणे, मुख्य कार्यकारी अधिकारी डी.के. मायदेव, संचालक प्रा. डॉ. आर.एस. निळपणकर, प्रा. व्ही.के. मायदेव, महेश मजती, प्रा. विजय आरबोळे, उमा तोरगल्ली, धारवाड शाखा चेअरमन प्राचार्य शिवानंद चौगला यांच्यासह अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.